महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/३-अ/सशस्त्र पोउपनि ते सशस्त्र पोनि /५७/२०२४ दिनांक २५ /०७/२०२५

**वाचा :-** १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/ कार्यासन १२, दिनांक ०१/०८/२०१९
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीबीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७/०५/२०२१
३. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग दिनांक १४/०७/२०२१

**-: आदेश :-**

उपरोक्त संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या दि. ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि. २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात येत असून, दि. २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजु झालेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयानुसार विभागीय पदोन्नती समितीने सशस्त्र पोलीस उप निरीक्षक यांना सशस्त्र पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्रता तपासून निवडसूची तयार केली आहे. निवडसूचीमध्ये पात्र ४ अधिकाऱ्यांना सशस्त्र पोलीस निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि. १४/०७/२०२१ मधील नियमांप्रमाणे महसूल विभाग वाटप करण्यात आलेला आहे.

२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील नमूद ४ सशस्त्र पोलीस उपनिरीक्षक यांना, त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून **" सशस्त्र पोलीस निरीक्षक"** या पदावर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ५ मधील घटकात करण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांनी मान्यता दिली आहे. :-

| अ.क्र. | सशस्त्र पोलीस उपनिरीक्षक यांचे नांव | सध्याची नेमणूक | वाटप महसुल विभाग | सशस्त्र पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नतीवरील पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | प्रमोद सुब्राव ढाळे | महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे | पुणे | रा.रा.पो.बल, गट क्र. १६, कोल्हापूर |
| २. | सुनिल केशव दिपटे | रा.रा.पो.बल, गट क्र. १५, गोंदिया | कोकण २ | रा.रा.पो.बल, गट क्र. ११, नवी मुंबई |
| ३. | सोमेश्वर मोतीराम शेंदरे | रा.रा.पो.बल, गट क्र. १७, चंद्रपूर | छ. संभाजी नगर | रा.रा.पो.बल, गट क्र. ३, जालना |
| ४. | अखलाकखाँ मुबारक पठाण | रा.रा.पो.बल, गट क्र. १७, चंद्रपूर | नाशिक | रा.रा.पो.बल, गट क्र. ६, धुळे |

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिका-यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित/ प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

(१) शिक्षा प्रस्तावित/ चालू झाली असल्यास

(२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास

(३) गुन्हा दाखल / दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास

(४) निलंबित असल्यास इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

४. सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतीम आदेशांच्या अधिन राहून व दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

५. मा. न्यायालय / महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण / निवडणूक आयुक्त यांचे आदेशाचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

६. सदर पदोन्नती आदेशामधील सशस्त्र पोलीस उप निरीक्षक हे जर आदेशामध्ये नमूद केलेल्या घटकामध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते ज्या घटकात कार्यरत आहेत, त्या घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, व तसे हया कार्यालयास न चुकता कळवावे.

**७. पदोन्नती झालेल्या वरील सर्व पोलीस अधिकारी यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन केले आहे.**

**रश्मि शुक्ला**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ३, जालना / गट क्र. ६, धुळे / गट क्र. ११, नवी मुंबई / गट क्र. १६, कोल्हापूर / गट क्र. १५, गोंदिया / गट क्र. १७, चंद्रपूर

**प्रत सस्नेह सादर,**

अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल- १, मुंबई / महालेखापाल - २, नागपूर

**प्रत,**

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, मुंबई

२. यांनी सदरचे आदेश सशस्त्र पोलीस उपनिरीक्षक यांना सशस्त्र पोलीस निरीक्षक ( Armed PSI to Armed PI Promotion) या पदावर पदोन्नती या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov. in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

कार्यासन अधिकारी, का.क्र. ०२/ ०९/ ११/ ११-अ/ ३६/ ४०

**( सुप्रिया पाटील यादव )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.

D:\SRPF order -23072025 (AutoRecovered).docx